MHYA160000712016

खटला दाखल तारीख : ३०.०१.२०१६
खटला नोंदणी तारीख : ३०.०१.२०१६
निकालाची तारीख : २४.०३.२०२६
कालावधी : १० वर्ष ०१ महिने २४ दिवस

# न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी यांचे न्यायालय,बाभुळगाव

(पीठासीन अधिकारी – श्री एच.एस.सातपुते यांचे समोर)

**नियमीत फौजदारी खटला क्र. २०/२०१६.** **निशाणी क्र. ७३/ब**

- महाराष्ट्र सरकार मार्फत
  पोलीस ठाणे बाभुळगाव,
  ता. बाभुळगाव जि. यवतमाळ. ....**अभियोग पक्ष.**

:: **विरुध्द** ::

(१) सुनिल शंकरराव डेबुर
वय : २७ वर्ष, धंदा : मजूरी,
(२) नामदेव शंकर भारती
वय :२७ वर्ष, धंदा : मजूरी,
(३) प्रविण रामदास गाडेकर (मयत)
वय : २१ वर्ष, धंदा : मजूरी,
सर्व, राहणार : खर्डा, ता. बाभुळगाव,
जिल्हा यवतमाळ. ....**आरोपी.**

**गुन्हा – भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४५७ व ३८० सह कलम ३४ अन्वये.**

...............................................................................................................................

- सहाय्यक सरकारी अभियोक्ता – श्री. पी. डी. राठोड
- आरोपीचे विधीज्ञ – श्री. जी. व्ही. कडूकार

...............................................................................................................................

## न्यायनिर्णय

(आज दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी पारीत)

आरोपी क्र. १ ते ३ विरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४५७ व ३८० सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवण्यात आला आहे.

अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे :-

२) दिनांक १८.०६.२०१५ रोजी फिर्यादी दिनेश राजेंद्र दुर्गेकर व त्याचे आईवडील रात्री १०.०० वाजता जेवण करुन झोपी गेले. त्यानंतर फिर्यादीची आई सकाळी उठली. त्यावेळी फिर्यादीच्या आईला घरातील कपाट उघडे दिसले. तेंव्हा फिर्यादीच्या आईला कपाटात ठेवलेल्या एका पितळेच्या डब्यात ठेवलेले ७०००/- रुपये दिसून आले नाहीत व खाली पर्स पडून असलेली दिसली. त्यामधील देखील ३०००/- रुपये दिसून आले नाहीत. त्यानंतर फिर्यादीच्या आईने फिर्यादीला व त्याच्या वडीलांना उठविले. फिर्यादीच्या वडीलांनी त्यांच्या शर्टच्या खिश्यात ठेवलेला नोकीया कंपनीचा मोबाईल त्याची किंमत १०००/- रुपये दिसून आला नाही. त्यानंतर ते सर्व त्यांच्या घराच्या मागील बाजूस गेले असता त्यांना त्यांच्या मागील दाराचा कोंडा तोडून अज्ञात चोरटे घराच्या आत घुसून त्यांनी दोन मोबाईल व १००००/- रुपये असा एकुन ११९००/-रुपयाचा मुद्देमाल रुपयाचा माल कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरुन नेल्याचे दिसून आले. त्यामुळे फिर्यादीने अज्ञात इसमाविरुध्द पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला.

३) फिर्यादीने दिलेल्या लेखी रिपोर्टवरुन पोलीस ठाणे बाभुळगाव येथे आरोपी अज्ञात व्यक्तीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४५७ व ३८० प्रमाणे अपराध क्र. १३६/२०१५ नोंदविण्यात आला आहे. तपासाचे काम सहाय्यक पोलीस नाईक अनिल सांगळे यांच्याकडे दिल्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे जाबजवाब नोंदविले आहेत. इतर कागदपत्रे मिळाल्यानंतर आरोपी क्र. १ ते ३ विरुध्द तपासाअंती पुरेसा पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

४) माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द निशाणी क्र. ३२ वर भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४५७ व ३८० सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेऊन आरोपींना

मराठी भाषेत वाचून व समजावून सांगितला असता आरोपींनी दोषारोपातील मजकूर कबुल नसल्याचे सांगून संपरिक्षेची मागणी केली आहे. सदरचे प्रकरण चालु असतांना आरोपी क्र. ३ प्रविण रामदास गाडेकर हा मयत झाला आहे.

५) आरोपी विरुध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने तिन साक्षीदार तपासले आहेत. निशाणी क्र. ३७ वर साक्षीदार क्र. १ दिनेश राजेंद्रराव दुर्गेकर (फिर्यादी), निशाणी क्र. ४० वर साक्षीदार क्र. २ पुरुषोत्तम विठ्ठलराव शिंदे (घटनास्थळ पंच), निशाणी क्र. ६८ वर साक्षीदार क्र. ३ मोहम्मद तंजीम हुसेन (निवेदन पंच/जप्ती पंच) अन्वये तपासले आहेत. दिनांक २४/०३/२०२६ रोजी अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला आहे.

६) आरोपींचे भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम ३५१ प्रमाणे स्पष्टीकरण अनुक्रमे निशाणी क्र. ७१ व ७२ प्रमाणे नोंदविण्यात आले आहे. आरोपींनी त्यांच्याविरुद्ध खोटी केस केली आहे, असा बचाव घेतलेला आहे.

७) अभिलेखावरील पुरावा व दोन्ही पक्षांचे युक्तीवाद यावरुन खालील मुद्दे माझे अवलोकनार्थ उपस्थित झाले आहेत. त्या प्रत्येक मुद्दयांना मी कारणांसह खालीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे.

| अ.क्र. | वाद मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक १८/०६/२०१५ ते १९/०६/२०१५ रोजी मध्यरात्री आरोपींनी संगणमत करुन मौजा फाळेगाव ता. बाभुळगाव जि. यवतमाळ येथील फिर्यादी नामे दिनेश राजेंद्र दुर्गेकर याच्या घराचे दाराचा कोंडा तोडून चोरी करण्याच्या उद्देशाने आत प्रवेश केला. त्यामुळे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ४५७ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला आहे ? | ..... नाही. |

| अ.क्र. | वाद मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| २) | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन मौजा फाळेगाव ता. बाभुळगाव जि. यवतमाळ येथील घरात शिरुन १००००/– रुपयाची चोरी केली. त्यामुळे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ३८० सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला आहे ? | ..... नाही. |
| ३) | काय आदेश ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

**अभियोग पक्ष निशाणी क्र.  निशाणी क्र. ३८ वरील जबानी रिपोर्ट, निशाणी क्र.३९ वरील प्रथम खबर अहवाल, निशाणी क्र. ४१ वरील घटनास्थळ पंचनामा, निशाणी क्र. ६९ वरील निवेदन पंचनाम्यावरील सही, निशाणी क्र.७०वरील जप्ती पंचनाम्या वरील सही इ. कागदोपत्री पुराव्यावर विसंबुन आहे.**

## :: कारणमिमांसा ::

**मुद्दा क्र.१ व २  करीता**

८) आरोपीन क्र. १ ते ३ यांनी दिनांक १८/०९/२०१५ ते १९/०६/२०१५ रोजी फिर्यादीच्या घरातून १००००/– रुपयाची चोरी केली हे सिध्द करण्याकरीता  १ ते ३ साक्षीदारांना तपासले आहेत.

९) अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. १ याने न्यायालयाच्या पुढे शपथेवर असे सांगीतले आहे की, तो आरोपीला ओळखतो. घटना दिनांक १८.०६.२०१५ रोजी रात्रीचे सुमारास त्याच्या घरी घडली होती. त्यावेळी तो झोपला होता. सकाळी  त्याच्या आईला आलमारी उघडी दिसली. आलमारीतील डब्बा उघडा होता व त्यातील ७०००/– रुपये चोरीस गेले होते. दुसऱ्या खोलीमध्ये रिकामी पर्स पडलेली होती व त्यातील ३०००/– रुपये चोरी गेले होते. तसेच एक नोकीया कंपनीचा मोबाईल चोरीस गेला होता. ज्याची किंमत १०००/– रुपये होती.  त्यामुळे

त्याने निशाणी क्र. ३८ प्रमाणे त्यांनी रिपोर्ट दिला व निशाणी क्र. ३९ वरील प्रथम खबरी अहवाल त्यांनी दिला असल्याचे सांगीतले. त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगुन त्यावर त्याची सही असल्याचे सांगीतले.

१०) अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. २ हा घटनास्थळ पंच असून त्याने न्यायालयापुढे असे सांगीतले की, तो आरोपीला ओळखतो. पोलीसांनी त्यांला फिर्यादीच्या घरी पंचनामा करण्याकरीता बोलाविले होते. त्याठिकाणी टपरी दरवाजा उघडा होता व कपाट उघडे होते. पोलीसांनी निशाणी क्र. ४१ वरील घटनास्थळ पंचनामा त्याच्या समक्ष तयार केला व त्यावर त्याची सही घेतली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

११) साक्षीदार क्र. ३ हा निवेदन व जप्ती पंचनाम्यावरील पंच असून त्याने न्यायालयाच्यापुढे शपथेवर असे सांगीतले की, पोलीसांनी त्यांना पंचनामा करण्याकरीता कुठेही बोलाविले नव्हते. निशाणी क्र.६९ वरील निवेदन पंचनामा आणि निशाणी क्र. ७० वरील जप्ती पंचनाम्यावरील केवळ त्यांची सही असल्याचे सांगीतले. त्यातील मजकुराविषयी त्यांना काहीही माहीती नसल्याचे त्यांनी सांगीतले. सदर साक्षीदार हा अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे त्याचा उलटपास घेण्यात आला परंतू त्यातूनही काही निष्पन्न झाले नाही.

१२) अभियोग पक्षाचा लेखी व तोंडी पुरावा, अभियोग पक्षातर्फे सहाय्य सरकारी अभियोक्ता श्री. पी. डी. राठोड व आरोपीतर्फे श्री. जी. व्ही. कडूकार यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकल्यानंतर मी अभिलेखावर आलेल्या लेखी व तोंडी पुराव्यावरील चर्चेकरीता वळत आहे. अभियोग पक्षाने उलटतपासात साक्षीदार क्र.१ याच्या निशाणी क्र. ३८ वरील जबानी रिपोर्ट मधील मजकुर व निशाणी क्र. ३९ वरील प्रथम खबर अहवालातील मजकुर न्यायालयाच्यापुढे सिध्द केला आहे. साक्षीदार क्र. १ हा त्याच्या सरतपासात घटना दिनांक १८.०६.२०१५ रोजी रात्रीच्या सुमारास त्याच्या घरी घडली होती. त्याची आई सकाळी उठल्यानंतर तिला आलमारी उघडी दिसली व त्यातील ७०००/– रुपये व एका पर्समधील ३०००/– रुपये चोरीला गेले होते. साक्षीदार क्र. १ याच्या वडीलांचा नोकीया कंपनीचा १०००/– रुपयाचा मोबाईल चोरीला गेला होता असे सांगत आहे. अभियोग पक्षाने निशाणी क्र. ३८ वरील जबानी रिपोर्ट व निशाणी क्र. ३९ वरील छापील प्रथम खबरी अहवालातील मजकुर नयायालयाच्यापुढे सिध्द केला असला तरी साक्षीदार क्र. १ हा त्याच्या उलटतपासात चोरीची घटना घडली त्यावेळी तो झोपला होता.

मुद्देमाल कोणी चोरी केला हे त्याला माहीती नाही. त्याने आरोपीला कधीच पाहीलेले नाही याबाबी मान्य करीत आहे. त्यामुळे साक्षीदार क्र. १ याची साक्ष मला विश्वासार्ह वाटत नाही. अभियोग पक्षाने साक्षीदार क्र. २ याच्या तोंडी पुराव्याने निशाणी क्र. ४१ वरील घटनास्थळ पंचनामा न्यायालयाच्यापुढे सिध्द केला आहे. आरोपींच्या विधिज्ञांनी साक्षीदाराचा उलटतपास घेतलेला नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामयातील मजकुर सिध्द झाला आहे. अभियोग पक्षाने साक्षीदार क्र. ३ याच्या तोंडी पुराव्याने निवेदन पंचनामा व जप्ती पंचनामा यावरील सहया न्यायालयाच्यापुढे सिध्द केलेल्या आहेत. अभियोग पक्षाला साक्षीदार क्र. ३ हा सहकार्य करीत नसल्याने त्याच्या तोंडी पुराव्याने निवेदन पंचनामा व जप्ती पंचनामा यातील मजकुर न्यायालयाच्यापुढे सिध्द झालेला नाही. अभियोग पक्षाने उलटतपास घेवून देखील साक्षीदाराने कोणतीही उपयुक्त माहीती दिलेली नाही. अभियोग पक्षाने ईतर कोणतेही साक्षीदार न्यायालयाच्यापुढे तपासलेले नाहीत. आरोपी क्र. १ ते ३ यांना चोरी करतांना प्रत्यक्ष कोणी पाहील्याचे दिसत नाही. त्यामुळे आरोपी क्र. १ ते ३ यांचा प्रत्यक्ष चोरीच्या गुन्हयात सहभाग निष्पन्न होत नाही. त्यामुळे आरोपी क्र. १ ते ३ विरुध्द निशाणी क्र. ३२ वर ठेवलेला भारतीय दंड विधान १८६० चे कलम ४५७ व ३८० सह कलम ३४ अन्वये ठेवलेला दोषारोप सिध्द होत नाही. त्यामुळे सदरच्या गुन्हयातून आरोपीला दोषमुक्त करणे योग्य राहील. म्हणून मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ३ करीता**

१३) अभियोग पक्षाच्या लेखी व तोंडी पुराव्यावरुन मी या निष्कार्षास आलेलो आहे की, भारतीय दंड विधान १८६० चे कलम ४५७ व ३८० सह कलम ३४ लागू करण्यासाठी आवश्यक असणारे घटक संशयाचे पलीकडे जाऊन आरोपीविरुध्द सिध्द झालेले नाहीत. म्हणून मी मुद्दा क्र. ३ चे उत्तराकरीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## -: आदेश :-

(१) आरोपी क्र. १ सुनिल शंकरराव डेबुर, आरोपी क्र. २ नामदेव शंकर भारती व आरोपी क्र. ३ प्रविण रामदास गाडेकर (मयत) यांना भारतीय दंड विधान १८६० चे कलम ४५७ व ३८० सह कलम ३४ या गुन्हयातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत

आहे.

(२) आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन कदबे रद्द करण्यात येतात.

(३) पोलीस स्टेशन बाभुळगाव यांना असे आदेशीत करण्यात येते की, जप्त मुद्देमाल एक मॅक्स कंपनीचा काळया निळया रंगाचा एम. एच. २४०६ क्रमांकाचा मोबाईल हा मालकी बाबतच्या कागदपत्राची शहानिशा करुन अपील कालावधी संपल्यानंतर मुळ मालकाच्या ताब्यात दयावा.

(३) आरोपी क्र. १ व २ यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ प्रमाणे या निर्णयाविरुध्द अपील झाल्यास त्यातील त्यांची उपस्थितीची हमी म्हणून प्रत्येकी रु. १५,०००/– रकमेचे जमानत द्यावी. आरोपीने दिलेले वैयक्तीक जमानत आजपासून सहा महिन्यापर्यंत वैध राहील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला)

Digitally signed by HARIDAS SANDIPAN SATPUTE
Date: 2026.03.25 17:51:43 +0530

बाभुळगाव. (एच.एस.सातपुते)

दिनांक :२४/०३/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

बाभुळगाव.